परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.**: परीक्षा/छावता/१७३६ **दिनांक** : ०३/११/२०२५

**अत्यंत महत्त्वाचे / कालमर्यादेचे**

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी २०२५ सत्राचे इतर विद्यापीठे अथवा स्वायत्त महाविद्यालयातून संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित; तसेच NON NEP पॅटर्नमधून NEP 2020 पॅटर्न्समध्ये सर्व विद्याशाखेच्या विविध अभ्यासक्रमांतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे, तसेच ज्यांचे मागील सत्र राहून गेले आहे अशा विद्यार्थ्यांची दोन्ही सत्रे एकत्रित आणि दुसऱ्या वर्षात थेट प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज.**
संदर्भ : परीक्षा/छावता/१७२४, दिनांक ०१/११/२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी २०२५ सत्राचे इतर विद्यापीठे अथवा स्वायत्त महाविद्यालयातून संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित; तसेच NON NEP पॅटर्नमधून NEP 2020 पॅटर्न्समध्ये सर्व विद्याशाखेच्या विविध अभ्यासक्रमांतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे, तसेच ज्यांचे मागील सत्र राहून गेले आहे अशा विद्यार्थ्यांची दोन्ही सत्रे एकत्रित आणि दुसऱ्या वर्षात थेट प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संदर्भीय पत्रान्वये सुरू करण्यात आलेले होते. सदर परीक्षांचे अर्ज भरण्याकरिता खालीलप्रमाणे अंतिम संधी देण्यात येत आहे :—

| विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा नियमीत कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब व अतिविलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने नियमित शुल्कासह परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| **०६/११/२०२५ दुपारी १२.०० पर्यंत** | **०६/११/२०२५ दुपारी ३.०० पर्यंत** | — | — | — | — | **०६/११/२०२५ सायं.५.०० पर्यंत** |

**विशेष टीप :**

१. NON NEP पॅटर्नमधून NEP 2020, दोन्ही सत्रे एकत्र लावणे किंवा थेट दुसऱ्या वर्षी प्रवेश अशा सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी कमी दिवसांचा कालावधी मिळालेला आहे हे लक्षात घेऊन महाविद्यालयांनी याबाबत बुधवारची सुट्टीही उपयोगात आणावी आणि परीक्षा विषयक प्रक्रिया निर्विघ्नपणे सुरू ठेवावी. तसेच यासंदर्भातील विद्यार्थ्यांची संख्याच मुळात कमी असल्याने या विद्यार्थ्यांना व्यक्तीशः संपर्क करून त्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी अवगत करावे. कारण याव्यतिरिक्तचा कोणताही कालावधी या विद्यार्थ्यांना अजिबातच मिळणार नाही. तसेच या विद्यार्थ्यांचे अर्ज भरताना कोणतीही त्रुटी राहू नये याचीही काळजी घ्यावी, यांचे कारण या विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत हॉल तिकीट दुरूस्ती उपलब्ध असणार नाही आणि पर्यायाने याबाबत महाविद्यालय जबाबदार राहतील त्यामुळे यासंदर्भात महाविद्यालये प्रमाद प्रकरणात समाविष्ट होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी.

...२/—

Scanned with OKEN Scanner

२. महाविद्यालयाने वर दर्शवल्याप्रमाणे परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर विद्यार्थ्यांनी तात्काळ परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य आहे. तसेच दिनांक ०६/११/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० नंतर विद्यार्थी नियमित शुल्क भरू शकणार नाहीत आणि पर्यायाने संबंधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे जमा होणार नाही त्या विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित राहण्याची नामुष्की अकारण येईल, याची विद्यार्थ्यांनी व संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज वेळेत भरून महाविद्यालयाकडे ऑनलाईन जमा केल्यावर आणि Preview Print सादर केल्यावर जर संबंधित महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याचा अर्ज वरील रकान्यातील कालमर्यादेत कायम झाला नाही तर सदरच्या विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित रहावे लागले, याबाबत महाविद्यालय जबाबदार राहतील त्यामुळे यासंदर्भात महाविद्यालये प्रमाद प्रकरणात समाविष्ट होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी.

४. अतिवृष्टी आणि सद्य:स्थिती लक्षात घेऊन विलंब व अतिविलंब शुल्क आकारण्यात आलेले नाही.

सबब, याद्वारे सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे/पाल्यांचे विहित मुदतीत अचूक परीक्षा अर्ज भरणे, तपासून कायम करणे आणि परीक्षा शुल्कही विहित कालावधीतच ऑनलाईन स्वरूपात भरणे; तसेच कोणताही पात्र विद्यार्थी/पाल्य परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थीच्या अभ्यासविषयांची निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी प्राचार्य/संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास सामोरे जावे लागते; पर्यायाने विद्यापीठ परीक्षा आयोजनावरही आणि त्याअनुषंगाने परीक्षा निकालांवर विपरित परिणाम होतो.

त्याचप्रमाणे विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात आणि हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या माहितीस तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

विशेष सूचना :

१. हिवाळी सत्र २०२५ परीक्षांचे अर्ज कायम करताना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षार्थी विद्यार्थ्याची ७५ टक्के उपस्थिती आणि सत्रपूर्ततेची काळजी घेणे अनिवार्य असून यासंदर्भातील सर्व कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील.

२. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा अर्ज कायम करताना महाविद्यालय स्तरावर यासंदर्भातील सर्व कागदपत्रे जतन करणे आणि परीक्षा नियोजन कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षाकालीन अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner